**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**गृह निर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.**
**फोन नं. ०२२-६६४० ५१५७ email ID:skarad@mhada.gov.in**
**जा.क्र.मुमावसंतंअधि./मावसंतं.कक्ष/प्रा./ई-निविदा/०४ दिनांक - / /२०२०**
**कामाचे नाव - म्हाडास्थित कलानगर बांद्रे येथील नवीन अस्तीत्वात असलेले सी.सी.टी.व्ही. सुरक्षा प्रणाली साहित्याचे पुरवठा, स्थापना, अंमलबजावणी व देखभाल करणेबाबत.**

## ई- निविदा सूचना

मुख्य आयसीटी अधिकारी/आयसीटी कक्ष/म्हाडा, १ ला मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ यांच्याद्वारे ओईएम प्रमाणपत्र/विक्री कर नोंदणीकृत प्रमाणपत्र प्राप्त अधिकृत वितरक असलेल्या प्राधिकृत विक्रेते/व्यावसायिक भागीदार यांच्याकडून वरील नमूद कामांकरिता डिजिटल स्वरूपात स्वाक्षरीकृत व अटीविरहित ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | संख्या | निविदा प्रपत्रपत्रांचे शुल्क (रु.) | इरठे (रु.) | कामाची मुदत | वैधता दिवस |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | म्हाडास्थित कलानगर वांद्रे येथील नवीन व अस्तित्वात असलेले सी.सी.टी.व्ही. सुरक्षा प्रणाली साहित्य पुरवठा, स्थापना, अंमलबजावणी व देखभाल करणेबाबत. | बी.ओ.क्यू. | रु.५,६००/- | रु.६१,८८९/- | २ महिने | १८० दिवस |
| २. | ५ वर्षासाठी ऑनलाईन ए.एम.सी. | १ | | | ५ वर्षासाठी ए.एम.सी. | |

१. संपूर्ण बोली प्रक्रिया हि बोली प्रणालीतून ऑनलाईन (ई-टेंडरिंग) असेल. सदर निविदा सूचनेच्या संदर्भातील सर्व अधिसूचना व विस्तृत अटी व शर्ती यापुढे वेबसाईट https://mahatenders.gov.in वर ऑनलाईन प्रसिध्द करण्यात येतील.

२. बोली दस्तावेज वेबसाईट https://mahatenders.gov.in वरून दि.०२/०१/२०२० रोजी सकाळी १०:०० ते दि.२७/०१/२०२० रोजी सायं ०६:०० पर्यंत डाऊनलोड करता येऊ शकतील.

३. निविदा प्रपत्रांचे शुल्क रू.५,६००/- (रूपये पाच हजार सहाशे फक्त) नापरतावा व इरठे रू.६१,८८९/- (रूपये एकसष्ठ हजार आठशे एकोणनव्वद मात्र) यांचे प्रदान ऑनलाईन स्वरूपात

करावे. सर्व अयशस्वी बोलीदारांची इरठे व्यावसायिक बोली विचारात घेण्याच्या निर्णयानंतर परत केली जाईल. केवळ यशस्वी बोलीदारांची इरठे कराराच्या पूर्ततेपश्चात परत करण्यात येईल.

४. कोणतेही दर नमूद करण्यापूर्वी ऐच्छिक बोली दाराने वेबसाईटला भेट द्यावी.

५. कोणतेही ऑनलाईन प्रदान करण्यापूर्वी कृपया वेबसाईट https://mahatenders.gov.in ऑनलाईन प्रदानासंबंधित असलेली वरील माहिती वाचावी.

६. इरठे खालील बाबींमध्ये जप्त करण्यात येईल :

अ) बोलीदाराने त्याची बोली वैधता कालावधीमध्ये मागे घेतल्यास.

ब) यशस्वी बोलीदाराच्या बाबतीत, बोलीदाराने कंत्राटावर स्वाक्षरी न केल्यास.

७. कोणत्याही एजन्सीला इरठेच्या प्रदानातून सवलत देण्यात येणार नाही.

८. तांत्रिक बोली दि.२९/०१/२०२० रोजी सकाळी ११:०० वा. मुख्य आयसीटी अधिकारी, आयसीटी कक्ष/म्हाडा, १ ला मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ यांच्या कार्यालयामध्ये वेबसाईट https://mahatenders.gov.in वर उघडण्यात येईल.

९. तांत्रिक बोली उघडण्याच्या वेळेस पडताळणीकरिता निविदाकारांनी मूळ दस्तावेज (जे बोली तयारी दरम्यान अपलोड केलेले होते) सादर करावेत.

१०. बोलीदारांनी तांत्रिक प्रस्तावात नमूद केल्यानुसार तांत्रिक लिफाफ्यांमध्ये पीडीएफ प्रकारातून माहिती व स्कॅन केलेल्या प्रती सादर कराव्यात.

११. पात्र बोलीदारांना व्यावसायिक बोलीच्या उघडण्याची तारीख व वेळेची माहिती दिली जाईल.

१२. बोलीदारांना कोणत्याही प्रमाणित संस्थेकडून वैध वर्ग २/३ डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र (डीएससी) प्राप्त करता येईल.

१३. मुख्य आयसीटी अधिकारी, आयसीटी कक्ष/म्हाडा, १ ला मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ हे कोणतेही कारण न देता कोणतीही वा सर्व निविदा स्वीकारणे वा रद्द करण्याचा अधिकार राखून आहेत.

१४. निविदा दस्तावेज डाऊनलोड करणे व बोली ऑनलाईन करणे यासंदर्भातील मार्गदर्शक तत्वे वेबसाईट https://mahatenders.gov.in वरून डाऊनलोड करता येऊ शकतील.

**सहाय्यासाठी हेल्पलाइन : ०१२०-४२००४६२, ०१२०-४००१००५, ०१२०-६२७७७८७**

**E-Mail : support-eproc[at]nic[dot]in**

स्वाक्षरी-

मुख्य मा.व सं.तं.अधिकारी

मा.व सं.तं.कक्ष/प्रा.